ललिता गंडभीर
65 Oxford Rd.
Newton Centre
MA 02459 U.S.A.
617 - 969 - 0805

# इमान

अमेरिकेत वाढणाऱ्या भारतीय मुलांच्या मनःपटलावर

भारतीय संस्कृतीची झिलई चढवण्यासाठी

आम्ही कल्चरल स्कूल सुरू केलं.

वर्गणी जमवली, एका शाळेत जागा मिळवली.

"मुलांना काय शिकवायचं?" याचा विचार सुरू झाला.

आणि मला समजलं

"भारतीय कल्चर म्हणजे काय?" हे आम्हा कुणालाच नक्की माहीत नव्हतं.

मला स्वतःला तर नव्हतंच नव्हतं.

करिक्युलम्‌साठी ब्रेनस्टॉर्मिंग सेशन झाला.

त्यात अनेक सूचना मांडल्या गेल्या.

भारतीय संस्कृती म्हणजे

"भारतीय कला, नृत्य, गायन, नाटक,"

"भारतीय खेळ हुतुतू, खो खो,"

"भारताचा इतिहास आणि भूगोल,"

"भारताच्या भाषा, हिंदी, मराठी, बंगाली,"

"भारताचं वाङमय, महाभारत, रामायण, शाकुंतल,"

"भारतीय सण, दिवाळी, गणपती, रंगपंचमी,"

"भारतीय परंपरा, स्वार्थत्याग, कुटुंबप्रेम,"

"भारतीय स्वैपाक, वेगवेगळ्या पद्धतीचा,"

ह्या मतामतांच्या गलबल्यातून

कसाबसा करिक्युलम् तयार झाला.

दर रविवारी सकाळी शाळा भरू लागली.

भाषेचा एक तास आणि कल्चरचा दुसरा.

ज्यांच्या कल्याणासाठी धडपडून शाळा सुरू केली होती

ती मुलं मात्र जाम वैतागली.

"We live in America.

Why do we have to learn Indian culture?"

"You have ruined our Sundays."

कल्चरच्या वर्गात कोण काय शिकवत होतं

ह्याविषयी मी अंधारात होते.

पण मुलांचे प्रश्न सुरू झाले.

"What was Radha and Krishna's relationship?"

"How can a man have ten heads?"

"I liked सत्यनारायन पूजा today."

"प्रसाद was good but stories were kind of dumb.

In those stories people had to bribe God."

एक दिवस तर कहर झाला.

मुलांनी अमराठी शिव्यांची यादी म्हणून दाखवली.

मी कपाळाला हात लावत म्हटलं,

"शिव्या हा सुद्धा संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे."

कल्चरच्या तासात इतर मुलांनी हे शिक्षण दिलं होतं.

२

भारतभेटीत लक्षात आलं,

"माझी पुणेरी मराठी संस्कृती

पुण्यातच अस्ताला जात होती."

भारतातले कझिनस् आता आमच्या मुलांशी

इंग्लिशमधे बातचीत करत होते.

आणि इतरांशी मंग्लिश बोलत होते.

गुढीपाडवा, तुळशीचं लग्न असे सण

फक्त माझ्या पिढीच्या स्मृतीत तग धरून होते.

माझ्या लहानपणी लांछनास्पद मानलं जाणारं

दारू पिणं आता केवळ समाजमान्य नव्हे,

अभिमानास्पद झालं होतं. "आम्ही पितो."

माझी मराठी संस्कृती आता

फक्त माझ्या मनात नांदत होती.

३

लहानपणी मी पुणे, मुंबई, कोल्हापूर, कोंकण,

अहमदाबाद, इंदूर अशा गावांची

वेगवेगळी संस्कृती अनुभवली होती.

भारतातल्या प्रवासात भारतातल्या वेगवेगळ्या

प्रांतांच्या संस्कृतीची निरनिराळी झलक

मला स्पर्श करून गेली.

मग पिढ्यान्पिढ्या स्थलांतरित

आफ्रिकन, कॅरेबियन, युरोपियन भारतियांची

संस्कृती मला भेटली.

भारतीय संस्कृतीच्या या तारांगणात मी

वर्षानुवर्ष मराठी संस्कृतीची चांदणी शोधत राहिले.

४

कधीतरी केव्हातरी उमजलं

भारतीय संस्कृती हा कलायडोस्कोप आहे.

ती आपले रंग सतत बदलते.

भारतीय संस्कृती हे मृगजळ आहे.

ती सापडते न सापडते तोच हरवते.

भारतीय संस्कृती ही नवरत्नांची खाण आहे.

तिच्यामधून विविध रत्नांची उधळण होते.

भारतीय संस्कृती समुद्राच्या लाटांसारखी आहे.

प्रत्येक लाट वेगळी दिसते आणि

समुद्रकिनाऱ्यावर विरून जाते.

आणि

भारतीय संस्कृतीचे हे सगळे आविष्कार

माझेच आहेत.

५

अमेरिकेतील मराठी समाजाने

कल्चरल स्कूलस् काढली.

मासिके व वृत्तपत्रं सुरू केली.

लावण्यांचे कार्यक्रम केले.

पुस्तके लिहिली.

कविता केल्या.

मराठी मंडळे स्थापन केली.

सामुदायिकरीत्या व घरात सण साजरे केले.

देवळं बांधली.

रांगोळ्या काढल्या.

आकाशकंदील केले.

सत्यनारायणाच्या पूजा केल्या.

घरी मराठी बोलण्याचा पायंडा पाडला.

मुलांना भारतभेटीस पाठवलं.

भारतातून कलाकार बोलावले.

मुलींना नृत्य शिकवलं.

मुलांच्या मुंजी केल्या.

अमेरिकन मुलांमुलींशी भारतीय पद्धतीने

आपल्या मुलांमुलींची लग्नं लावली.

अधिवेशनं भरवली

चर्चासत्रं केली

"इंडिया डे" साजरा करायला सुरवात केली

प्रतिष्ठानं स्थापन करून

उत्तम मराठी साहित्याला बक्षिसं दिली.

जे सुचेल ते करून अनिवासी मराठी भारतीयांनी

आपल्या बहुरंगी, अगम्य, बहुरुपी संस्कृतीला

स्वतःच्या ओंजळीत धरलं आणि

आपल्या संस्कृतीशी इमान राखलं.

*- ललिता गंडभीर*